The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
=====================================================================
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
-----------------------------------------------------------------------------------------------------------
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024
=====================================================================

# मध्ययुगीन भक्ती संप्रदाय आणि मराठी साहित्य

**प्रा. डॉ. विनायक जाधव**
के.के. एम. महाविद्‌यालय मानवत.

**प्रस्तावना**

मध्ययुगातील निरनिराळ्या भक्ती संप्रदायाने महाराष्ट्रीयन संस्कृतीच्या जडणघडणीबरोबरच मराठी साहित्याच्या जडण घडणीत मोलाचा हातभार लावलेला आहे. आपापल्या संप्रदायाचे तत्वज्ञान, आचारधर्म, परंपरा यांचे सातत्य कायम ठेवण्याचा प्रयत्नात मराठी साहित्याचे भरण-पोषण झाले. लोकभाषेतून धर्ममार्गाचा उपदेश झाला पाहिजे हे सर्व संप्रदायाचे समान उद्दिष्ट होते. या समान उद्दिष्टामुळे समाजात विविध भक्ती पंथाच्या विचारसरणीचा प्रसार झाला. यातूनच मराठी साहित्य निर्मितीला प्रोत्साहन मिळाले.

आपापल्या आराध्य देवताविषयी सर्व संप्रदायांनी निष्ठा बाळगली असली तरी इतर देवतांना विरोध केला नाही. त्यामुळे सामान्यांना बुद्धीभेद करण्यास निमित्तकारण मिळाले नाही. वारकरी संप्रदायाचे याविषयीचे धोरण सर्वसमावेशक होते. विठ्ठल या संप्रदायाचे आराध्य दैवत असले तरी या संप्रदायात यल्लमा, महालक्ष्मी, दुर्गा या सर्व देवतांना विठ्ठल स्वरूपी मानले आहे. समर्थ रामदासांना विठ्ठल मूर्तीत रामाचे दर्शन घडते अशा व्यापक कल्पना देवता विषयक मानल्या जातात.

सर्वसामान्य जनतेला धर्म प्राकृत भाषेत समजावून सांगणे आणि आचार सुलभ मार्गाचा उपदेश करणे हा हेतू डोळ्यासमोर ठेवून अनेक पंथांनी प्राकृत भाषेतून ग्रंथरचना केली. भक्तीमार्गाच्या प्रसारामुळे धर्माचरणाचा मार्ग सामान्यांना सुलभ झाला. या मार्गात जातिभेद नसल्याकारणाने एका मर्यादित सामाजिक समतेची प्रक्रिया देखील भक्तीपंथामुळे निर्माण झाली. परंतु, तेराव्या शतकाच्या अंती सुरू झालेल्या इस्लामी आक्रमणामुळे स्वधर्म आणि संस्कृती यांचे रक्षण करणे आवश्यक बनले. बदलत्या परिस्थितीत संत एकनाथांनी सांस्कृतिक पुनर्जीवनाच्या प्रक्रियेस चालना दिली. बदलत्या परिस्थितीत व काळाची गरज ओळखून साधुसंताने आपल्या उपदेशाला आणि साहित्याला एक व्यापक अधिष्ठान दिले. या उपदेशात सदाचार व समन्वयावर अधिक भर दिल्याचे आढळून येते.

नाथ संप्रदाय हा मध्ययुगीन काळातील सर्वात प्राचीन संप्रदाय होय. मराठीत साहित्य निर्मितीला या संप्रदायापासून प्रारंभ झालाआहे.'विवेकसिंधू'करते मुकुंदराज या संप्रदायाचे अनुयायी होते. वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक संत ज्ञानेश्वर देखील गुरुपरंपरेने नाथ संप्रदाय होते. मराठी साहित्याच्या निर्मितीस प्रेरणा देण्यात नाथ संप्रदायाचे योगदान महत्त्वाचे आहे.

**१. नाथ संप्रदाय**

भारतात हिंदू धर्मात ग्लानी आल्यावर काल परिस्थितीनुसार त्यात चैतन्य निर्माण करण्यात साधुसंत व युगपुरुष पुढे होते. यांच्या परंपरेचा उपलब्ध साहित्याच्या आधारे शोध घेतल्यास सातव्या आठव्या शतकापासून या सिद्धसाधूंची परंपरा असल्याचे दिसून येते. ही परंपरा बंडखोराची म्हणजे

प्रस्थापित धर्मधारणेविरुद्ध बंड करणारांची. धर्म सदाचारातून अभिव्यक्त व्हावा ही सामान्य धारणा या बंडखोरांची. समाजात हिंदू धर्म नांदावा यासाठी तो लोकांच्या भाषेत सांगितला पाहिजे असा त्यांचा आग्रह. नाथसंप्रदाय अशाच बंडखोरीतून उदयाला आला. "नाथ संप्रदायाची परंपरा सांगणारे विपुल साहित्य प्राचीन व मध्ययुगा त मराठी वाङ्मयात आढळते"[१]

मराठी भाषेतला आद्यचरित्रग्रंथ 'लीळाचरित्र' हा गोरखनाथ व इतर साधुसंताविषयी माहिती देतो. सर्वज्ञ चक्रधरांनी अनेकदा गोरखनाथविषयी आदरभाव व्यक्त केला आहे. स्वतः चक्रधरांनी नाथजोग्याचा वेषधारण करून 'बैरागी भाषेत चौपदी रचल्या गेल्याचा उल्लेख लीळाचरित्रात येतो. या नाथपंथीयांच्या वावर भारतभर असल्याने भारतातील अनेक भाषेचे संस्कार त्यांच्या वाणीवर झाल्याचे दिसून येतात. त्यांची वाणी 'वैरागी भाषा' या नावाने महाराष्ट्राला परिचित होते असे लीळाचरित्रातील उल्लेखावरून निष्पन्न होते. या पंथाच्या विचारसरणीचे खंडन करण्याची आज्ञा नागदेवाचार्यांनी केल्या कारणाने दामोदर पंडिताने 60 चौपाद्या रचल्या. त्यातील काही बैरागी भाषेत आहेत. नाथवाणीच्या अधिकृत संग्रह गोरखवाणी आहे. यावर मराठी भाषेची संस्कार झालेले आहेत. 'गोरखवाणी' ही नाथ संप्रदायाची भाषा आणि पुढं सुफी संतांनी आपल्या साहित्यासाठी योजलेली दख्खनी या नावाचे ख्याती पावलेली भाषा या उत्क्रांतीच्या भिन्नकालीन रुपे असून या प्रक्रियेची परिणती राष्ट्रभाषेत झालेली आहे. राष्ट्रभाषेचा उद्भव विकासास नाथसंप्रदाय कारणीभूत ठरला .

नाथ संप्रदायाची परंपरा सांगणारे विपुल साहित्य मध्ययुगीन मराठी वाङ्मयात आढळते ज्ञानेश्वर व एकनाथी भागवत आणि वारकरी संप्रदायाचे अन्य साहित्य याच विचारसरणीचा पुरस्कार करणारे आहे. ज्ञानेश्वरी व वारकरी संप्रदायाचे अन्य साहित्यातून झालेला समाजधर्माचा प्रसार एका परीने नाथ संप्रदायाच्या विचारसरणीची विकासा मानता येईल.

भगवद्गगीतेतील ज्ञानोत्तर कर्माच्या धारणेचे पुनरुजीवन नाथसंप्रदायाच्या विचार- प्रणालीत झालेले असून हट्टयोगादी साधनांच्याद्वारे समाधी- साधना झाली तरी लोको उद्धार अर्थ कार्यरत राहण्याचा उपदेश नाथपंथात आढळतो. हठ्ठयोग प्रदीपिका हा नाथसंप्रदायातील एक प्रमाण ग्रंथ होय. या ग्रंथातही राजयोगाच्या सिद्धीसाठी हठ्ठ योगाची साधना करावयाची असते असे स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे. मुकुंदराजाच्या विवेक सिंधुतून राजयोगाचेच प्रतिपादन आलेले आहे. ज्ञानदेवाच्या काही अभंगात 'राजयोगी' हे विशेषण आढळते. "समाधी अवस्था न भंगू देता ज्ञानोत्तर कर्म करून लोकोध्दार करणे ही राजयोगी संबंद्ध असलेली कल्पना आहे याच धारणेचा शिवशक्ती समावेश या परिभाषेत नाथसंप्रदायचा वाङ्मयात उल्लेख होत असतो."[२] वारकरी संप्रदायाची विचारसरणी ही नाथ संप्रदायाच्या तत्त्वज्ञानातून कशी झाली आहे.

**२. वारकरी संप्रदाय**

महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय हा अग्रस्थानी आहे गेली ७०० वर्षे या संप्रदायाने महाराष्ट्रीयन समाजाच्या सर्वस्तरात संस्कार घडविण्याचे कार्य केले . या संप्रदायाने बाराव्या शतकापासून धर्म, संस्कृती आणि सदाचार यांचा प्रसार करण्याची महत्त्वाची कामगिरी केली आहे.

" मध्ययुगीन महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या पंथो पंथापैकी एक संप्रदाय एवढेच वारकरी संप्रदायाचे स्थान नक्कीच नाही तेराव्या शतकात सुरू झालेली व आजवर अखंडितपणे चालू असलेली ती एक धार्मिक व सामाजिक चळवळ आहे. तिचे परिणाम साहित्य व समाजजीवन या दोघांवरील झालेले आहेत."[3] या चळवळीने संस्कृती संवर्धन व समाजप्रबोधन ही दोन्ही कार्य केलेली आहेत. विठ्ठल या संप्रदायाचे आराध्य दैवत असले तरी इतर देवदेवतांना या संप्रदायाने नकार दिला नाही.समाजाला व्यापक दृष्टी दिल्याने या संप्रदायाने वर्णभेदावर मात केली आहे.

आधुनिक भारतीय भाषांच्या उदयकाळापासून देशाच्या निरनिराळ्या प्रदेशातील वेगवेगळ्या भक्ती संप्रदायाने प्रादेशिक भाषेच्या सहाय्याने समाजजीवनात सांस्कृतिक मूल्यांची जोपासना करण्याचे कार्य केले. यासाठी वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम आदी संतांनी ग्रंथ व अभंग लिहिले त्यांच्या या कार्यासाठी बहिणाबाईनेचा अभंग समर्पक ठरतो.

संत कृपा झाली। इमारत फळा आली
ज्ञानदेव रचिला पाया। तया उभारले देवालय
नामा तयाचा कीकर । तेने रचिले ते आवर
जनी जनार्दन एकनाथ। खांब दिधला भागवत
तुका झालासी कळस। भजन करा सावकाश

या अभंगाप्रमाणे संत ज्ञानेश्वरांनी फक्त भागवत धर्मापुरते पुरताच पाया रचला नसून त्यांनी मराठी साहित्याच्या दृष्टीने पाया रचण्याचे काम केले. मराठी भाषेचा जयजयकार प्रथम त्यांनी केला.' हा काव्या राव ग्रंथ गुरुवंत ठाव इथोनिया रसा झाला आवो रसाळपणा 'हे वचन प्रथम त्यांनी सार्थक केले. यासाठी त्यांनी भावार्थदीपिका उर्फ ज्ञानेश्वरी ही भगवद्गगीतेवरील टिका लिहिली. ज्ञानदेवाने आपली टीका रूक्ष किंवा शास्त्रीय पद्धतीने लिहिली नाही. त्यांनी भाष्यकरांना वाटही पुसली आहे; पण आपली टीका कर्कश होऊ दिलेली नाही. ही टीका म्हणजे मराठी साहित्याचे एक अनमोल लेणे आहे. आपली ही टीका शंकराच्या माथ्यावर पाय ठेवील हा आपला उदगार ज्ञानदेवाने सार्थ करून दाखवला आहे .त्यांचा हा ग्रंथ शांतरसाचा उत्कृष्ट आविष्कार आहे. या ग्रंथात वेधक शब्दचित्रे, उचित उपसंहार, समर्पक उपमा व दृष्टांत, मराठी भाषेविषयी प्रेम, गाढ तत्त्वज्ञान अशी गुणसंपन्न श्रेष्ठ साहित्यकृती मराठी सारस्वतात प्रारंभ काळात उभी टाकते यामुळे पुढील काळात अनेक श्रेष्ठ संत कवीने याच्या प्रकाशात वाटचाल करण्यात धन्यता मानली.

'अमृतानुभवं हा काव्य आणि तत्त्वज्ञान या दोन्ही दृष्टीने ज्ञानेश्वरीच्या वरची पातळी गाठणारा ग्रंथ आहे .योगी चांगदेव यांनी कोरे पत्र पाठविल्यावर त्याला उत्तर देण्याच्या निमित्ताने ६५ ओव्याचे एक अद्वैतानुभूती पर काव्य ज्ञानदेवांनी लिहिले. ते चांगदेवपासष्टी म्हणून प्रसिद्ध आहे . अथांग आकाशाचे छोटेसे प्रतिबिंब एखाद्या जलाशयात पडलेले दिसावे व त्याचा आपल्या मनाला या बिंबरुप आकाशाहूनही अधिक मोह पडावा तशी चांगदेवपासष्टीतील अविष्काराची गुणवत्ता आहे. ज्ञानदेवाचे अभंगातून अनुभवाची उत्कंठता व रचनेची कोवळीकता आढळते. योगपर व आत्मानुभवापर

अभंग, गौळणी, विराण्या यात विशेषतः जाणवते. हरिपाठाचे अभंग हा छोटा गट वारकऱ्यांचा नित्य पाठात आहे. एवढी अवलोकिक रचना ज्ञानदेवांनी केवळ आयुष्याच्या बावीस वर्षात केली. ज्ञानेश्वरी या पंथाचा जणू धर्मग्रंथच आहे.

एकाच काळात संत ज्ञानेदेव व संत नामदेव हे दोन थोर कवी महाराष्ट्रात अवतरले. यांच्या परस्पर पोषक जीवनकार्यामुळेच महाराष्ट्रात संतांची एक मालिकाच निर्माण झाली. त्यांच्या अभंगाची पडसाद खेड्यापाड्यात घुमू लागले. त्यांच्या सहज स्फुर्त उद्‌गारात शुद्रांना आपल्या अंतकरणाची ओळख पटली. संत सावता माळी, संत नरहर सोनार, संत जगमित्र नागा, संत चोखामेळा वगैरे संत नामदेवाच्या सुरात सूर मिळून गाऊ लागले. त्यांच्या अंत:करणातील आत्मविश्कराच्या उर्मी उफाळून वर आल्या आणि शेकडो अभंगाच्या रूपाने त्या प्रकट झाल्या.

भारतीय भक्ती साहित्याचा इतिहास हा एकूण बाराशे ते चौदाशे वर्षाचा इतिहास आहे. बाराशे-तेराशे वर्ष भारतात जे भक्तीसाहित्य निर्माण झाले,त्यांचा एक घटक असलेले नामदेवांचे काव्य केवळ गुणांनी श्रेष्ठ आणि भारतीय भक्ती साहित्याचे प्रतिनिधी आहे असे नाही, तर त्या काव्याचे स्वतःचे वैशिष्ट्य आहे. 'आम्हा सापडले वर्म। करू भागवत धर्म 'ही त्यांची प्रतिज्ञा अभंग रचनेच्या आधारित त्यांनी सफल केली. त्यांचे काव्य बहुकक्ष आहे. साहित्य प्रकाराच्या नवीन वाटा त्यांनी शोधलेल्या आहेत. संत ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडाच्या चरित्रातून नामदेवाची चरित्रकाराची भूमिका अभ्यासण्यासारखी आहे. संत नामदेवांनी आपल्या अभंगातून ज्ञानेश्वरचरित्र लिहून पद्‌य माध्यमातून चरित्रात्मक लेखनाचा प्रारंभ केला व चरित्रात्मक लेखनाचे उद्दिष्ट सफल केले. स्वतःच्या अनुभूतीला नामदेव महत्त्व देतात. तन्मयता हे संत नामदेवांचे सामर्थ्य. भक्ती व श्रद्धा हे विशेष. संत नामदेवांनी आदी, तीर्थावळी, समाधी अशी त्रिखंडात्मक चरित्र लिहिली. अभंगात्मक आली चरित्रे, स्फुट आख्यान वजा चरित्रे ही नामदेवांनी निर्मिलेली लेखनस्वरूपे. पौराणिक परंपरेशी संत नामदेवांनी आपले नाते शोधले. संत नामदेव हे मराठीतील पहिले आत्मचरित्रकार होत भाबड्या बालपणापासून ते जगी ज्ञानदीप लावण्यास निघालेल्या विष्णू दासापर्यंतचा संत नामदेवाच्या जीवनप्रवास या आत्मपर अभंगातून प्रत्ययास येतो. संत जनाबाई, संत सावता माळी, संत गोरोबा कुंभार, संत चोखामेळा आदी समकालीन संतांची व्यक्तीचित्रे त्यांनी रेखाटली आहेत. तसेच पांगुळ, वासुदेव इत्यादी भारुडाची रचना केली. त्यांची कूट कविता ही प्रसिद्ध आहे. भीष्मप्रतिज्ञा, दशावतार यासारखे आख्यान काव्य त्यांनी लिहिली. त्यांचे अभंगकाव्य हे पारमार्थिक भाव्यकाव्याचा उत्कृष्ट नमुना आहे. भुपाळ्या व आरत्या ही त्यांची भक्तीगीतेच आहेत. अशा रीतीने विविधस्तरातील लोकांचे समाधान करणारी रूपकात्मक कविता लिहून त्यांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली.

संत एकनाथ हे १३५० ते १६५० या मराठी वाङ्मयाच्या दुसऱ्या कालखंडातील सर्वात महत्त्वाची कवी होते. संत एकनाथांनी भागवतामधील चार श्लोकावर 'चतु: श्लोकी भागवत' लिहिले. त्यांच्या पुढील ग्रंथकर्तृत्वाची चुणूक या पहिल्या रचनेत दिसून आली. भागवताच्या एकादशस्कधावर संत एकनाथांनी लिहिलेले 'एकनाथी भागवत' या ग्रंथावर संत ज्ञानेश्वराची मोठी छाप आहे. मराठी

भाषेबद्दल अभिमान, गुरुविषयी आदरभाव, श्रीकृष्णाविषयी नितांत प्रेम, अद्‌वैताचा पुरस्कार भक्तीभावनेच्या विविध छटा, अध्यात्माची सरस प्रस्ताविके व उपसंहार अशा अनेक बाबतीत संत एकनाथांनी संत ज्ञानेश्वरांचे अनुकरण केले.ज्ञानेश्वरीमध्ये अनेक अपपाठ शिरले होते. संत एकनाथांनी सन १५८४ मध्ये तिची शुद्ध प्रत सिद्ध केली. मराठी भाषेतील संहिताशोधनाचा हा पहिलाच प्रयत्न म्हणावा लागेल. संत एकनाथांनी 'रुक्मिणी स्वयंवर' हे काव्य नेहमीचाच प्रसन्न व अलंकार पूर्ण शैलीत लिहिले. 'भावार्थ रामायण'संत एकनाथांचा ग्रंथ अपूर्ण असतानाच मतांनी ही लोकांचा निरोप घेतला व त्याच्या गावोबा या शिष्याने तो ग्रंथ पूर्ण केला याचबरोबर अभंग पदे भारुडे गवळणी विरागण्या अशा स्पोटरचना एकनाथांनी केलेली आहे भारुडे हा प्रकार त्यांच्यामुळेच रोड झाला विविध देवता व्यवसाय प्राणी खेळ यांचा भारुडामध्ये त्यांनी कौशल्यपूर्ण उपयोग करून घेतला संत ज्ञानेश्वर आनंदाचे श्रेष्ठ ग्रंथकार म्हणजे संत एकनाथ संत ज्ञानेश्वराच्या खालोखाल एकनाथी भागवत याला वारकरी पंथात मान्यता लाभली आहे.विविधता हा नाथाच्या वाङ्मयच्या विशेष होय जवळजवळ ४००० अभंग त्यांच्या नावावर आहेत त्याशिवाय ज्ञानेश्वरीचे संशोधन केले रुक्मिणी स्वयंवर केलेले प्रदीर्घकथा पर रचना केली एकादस कंदात विसरती काय लिहिली आणि विविध प्रकाराची स्कूटरचना लिहिली काही गद्यही लिहिले ते सर्व लिखाण मराठी साहित्यात भर घालणाऱ्या संत एकनाथांच्या समकालीन नाथपंचक म्हणतात. ते दासोपंत, रामा जनार्दन, विठा रेणुकानंदन व जनी जनार्दन या संतांनी अभंग रचना करून मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे.

संत ज्ञानेश्वर यांच्या वारकरी संप्रदायाच्या पाया घातला. त्यांचा कळस संत तुकाराम झाले असे वारकरी सांप्रदायिक मानतात. साहित्याच्या दृष्टीने नियमात यथार्थ आहे त्यांनी साडेचार हजार अभंग लिहिले. ते त्यांचे वाङ्मय. परमार्थाची वाटचाल करतानाचे अनुभव आले ते तुकारामाने हे अभंगांमध्ये शब्दबद्ध केले. 'अंतरीच्या धावे स्वभाव बाहेरी' असे त्यांचा अपंगाचे स्वरूप आहे. ते सहज उत्स्फूर्त आहेत. ही सहजता सौंदर्याला जन्म देते व त्यामुळेच ते उद्‌गारवाचकाचे अंतःकरणाला जाऊन भिडतात. संत तुकाराम आणि दैनंदिन व्यवहारातील भाषा संपन्न केली. त्यांचे अनेक अभंगाची कडवी मराठी भाषेची वाक्प्रचार होऊन गेले आहेत. संत तुकाराम हे संत असले तरी ते वृत्तीने परखड होते. त्यांच्या वाणीत असलेली वास्तवाचे प्रखर जाणीव हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष आहे. त्यांनी अनेक दृष्टांत रोजच्या अनुभवातून घेतले आहेत. त्यांची भाषा मेणाऊन मऊ होती तशीच प्रसंगातीत ती वज्राहून कठोर होऊ शकते. मराठी अभंग वाङमयात सर्वश्रेष्ठ स्थान तुकोबांना देण्यात आले आहे. मराठी साहित्यात संत तुकारामाचे अभंग हे मराठी साहित्याला लाभलेले अमृत फळ होय.

संत तुकारामाचे धोरण हे बहुदा आक्रमकच राहिले. आपल्या तिखट व मर्मभेदी शब्दानी समाजातील अनिष्ट प्रवृत्तीवर निर्भीडपणे हत्यार उपसले. बहुजन समाजातील सामान्य व्यक्तीचे राग, द्‌वेष आणि अशा-आकांक्षा त्यांनी आत्मियतेतून अभंगात आविष्कृत केल्या. संत तुकाराम यांनी आपल्या अभंगाद्‌वारे या पंथाची शिकवण समाजाच्या अगदी खालच्या थरापर्यंत पोहोचण्याची शिकस्त केली. त्यांच्या अभंगात आत्मप्रचीतीचा ओलावा आहे. भावनोत्कटतेचे सामर्थ्य आहे. सामाजिक

अन्यायाची चीड आहे. मानवतेबद्दल नितांत श्रद्धा आहे. अशा प्रकारे संत तुकारामाने आपले अभंगातून समाजकंटकाची येथोचित संभावना करून चिरंतर नितिमूल्याची जोपासना केली आणि भागवत धर्माच्या देवालयावर कळस चढवण्याचे कार्य केले.

**२) महानुभाव संप्रदाय**

“महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनापेक्षा मराठी साहित्यात मोलाची भर घालणारा पंथ या दृष्टीने महानुभाव पंथास महत्त्वाचे स्थान आहे.”[४] मराठी साहित्याच्या प्रारंभ काळात महानुभाव संप्रदायाने विपुल व विविध स्वरूपाची साहित्यनिर्मिती केली. आठवणी (लीळा), दिनचर्या, स्थलवर्णन, व्यक्तीवर्णन, कथात्मक भावगीत, सद्दस्य तात्विक व विवेचनपर अशा विविध प्रकाराची रचना महानुभवानी केली. लीळाचरित्र, वृद्धीपुरलीळा, स्मृतीस्थळ, सिद्धांतसूत्रपाठ, पूजावसार हे गद्य तर सातीग्रंथ, मूर्तिप्रकाश, धवळे हे पद्य अशा दोन्ही प्रकारात लेखन केले. एका धार्मिक प्रेरणेने प्रेरित झालेले महानुभव साहित्य विविधतेच्या व वैचित्राच्या बाबतीत इतर कोणत्याही साहित्याला मागे टाकतील असे आहे. पद्य विभागात आशय व अभिव्यक्तीत विविधता आहे. बहुतेक गद्यग्रंथ संकलनात्मक आहेत. पद्यग्रंथ ही मात्र स्वतंत्र निर्मिती आहे. गद्य वाङमयात सहजता, वास्तवता, नाट्यपूर्णता व परिणामकारकता हे गुण जाणवतात. तर लालीत्य, अलंकारप्रचुरता, कल्पनाराम्यता व भावनोत्कटता हे विशेष पद्यग्रंथात जाणवतात. गद्यांमध्ये भाषेचा जिवंतपणा तर पद्यामध्ये रसरशीतपणा जाणवतो.

महानुभाव चरित्रात्मक लेखनाने मराठीमध्ये चरित्रात्मक लेखनास सुरुवात झाली. महानुभाव संप्रदायात श्री दत्तात्रय चरित्र, श्री कृष्ण चरित्र, श्री चक्रपाणि चरित्र, श्री लीळाचरित्र, श्री ऋधीपूर चरित्र, श्री स्मृतीस्थळ अशा चरित्रग्रंथाची मालिका लिहिली गेली. या चरित्रात्मक लेखनामध्ये भक्ती ही प्रमुख प्रेरणा होती. सामग्रीच्या संदर्भात माहीम भटाने शिष्य समुदायात हिंडून स्वतः परिश्रमपूर्वक सामग्री संकलित केली. नागदेवाचार्याच्या मदतीने त्याची चिकित्सा केली. अन्वयार्थ लावला. सत्याविषयी प्रमाण्यबद्धी दाखवली. नव्याने चरित्रात्मक लेखन केले जात असूनही चरित्रात्मक लेखनाचे उद्दिष्ट महानुभव पंथातील चरित्रकाराने सफल करून दाखविले. महानुभवानी चक्रधरस्वामी, गोविंदप्रभू, चांगदेव राऊळ, श्रीकृष्ण, दत्तात्रेय नागदेवाचार्य आदी केवळ उपास्य अवतारी पुरुष व आचार्य यांची चरित्र विषय म्हणून निवड केली. महानुभाव चरित्रात्मक लेखन स्मरण शक्तीमुळे निर्दोष झाले आहे. महानुभवाने चरित्रात्मक लेखनाच्या रूपसिद्धीच्या दृष्टीने संकलनात्मक लीळाचरित्र, पूजावसार, स्थानपोथी, मूर्तीज्ञान, प्रसादसेवा व बेलापूर चरित्रे ही चरित्रे रुपे बनली. हे चरित्रात्मक लेखन सामर्थ्य प्रकटवून गेली.

महानुभाव साहित्यात सातीग्रंथ नावाचा पद्य विभागातील एक महत्त्वाचा गट आहे हे सर्व ग्रंथ ओवीबद्ध आहेत. यात नरेंद्राचे ‘रुक्मिणी स्वयंवर’ भास्करभट्ट बोरीकरांचा ‘शिशुपालवध’ व ‘उद्धवगीता’ दामोदर पंडितांचे ‘वच्छाहरण’ पंडित विश्वनाथ बाळापुरकर यांचा ‘ज्ञानप्रबोध’ खळोव्यास यांचे ‘सह्याद्रीवर्णन’ आणि नारो बाहाळिये यांचे ‘ऋद्धिपूरवर्णन’ हे सात ग्रंथ प्रसिद्ध आहेत. हे सातीग्रंथ

एकाच काळातील नसून त्यांचा कालावधी सव्वाशे वर्षाचा आहे. ओवीबध्दरचना व आख्यान काव्याला शोभावा ईतपत विस्तार एवढेच साम्य या साती ग्रंथांमध्ये आहे. या सात पैकी चार ग्रंथाचा विशेष श्रीकृष्ण चरित्र हा आहे तर उरलेल्या तिन्हीमध्ये भगवद्गीता, दत्तात्रय चरित्र व क्षेत्र महात्मा आलेले आहे. यासाठी ग्रंथांना महानुभव साहित्यातच नव्हे तर मराठी वाङ्मयाच्या इतिहासामध्ये मानाचे स्थान आहे.

**३. दत्त संप्रदाय**

श्री नृसिंह सरस्वतीने कर्नाटकात गाणगापूर येथे दत्त संप्रदाय प्रवर्तित केला आहे. या संप्रदायात गुरुचरित्र या ग्रंथाने संत एकनाथाच्या पूर्वी असलेल्या अंधार युगात दीपस्तंभ सारखे काम केले. संत एकनाथांनी आपल्या गुरुपरंपरेविषयी बारा अभंग एकनाथाच्या गाथेत आहेत. या गुरुपरंपरेनुसार एकनाथ दत्त संप्रदाय ठरले. मराठी साहित्याचा विचार करता 'गुरुचरित्र', दासोपंताचे साहित्य आणि एकनाथी भागवत या साहित्याचे लेखक दत्त संप्रदाय आहेत. मध्ययुगीन साहित्याच्या बाबतीत डॉ. आर. सी. मुजमदार यांनी काढलेले निष्कर्ष उद्बोधक ठरतात. "जनतेच्या भाषेत ते आपला अनुभव व्यक्त करत समाजाला सन्मार्गाला लावण्याचा उद्देशाने ते उपदेश करीत. त्यांच्या ठाई असलेल्या अलौकिक गुणांमुळे लोक संताची भक्ती करीत आणि त्यांनी उपदेशीलेल्या मार्गाचे अनुसरण करीत असत."[५]

**४. समर्थ संप्रदाय**

समर्थ रामदासाच्या व्यक्तिमत्वामुळे हा संप्रदाय त्यांच्या नावाने ओळखला जातो. भक्ती, कर्म आणि ज्ञान यांच्या विषयी समर्थांची भूमिका वारकरी संप्रदायापेक्षा फारशी वेगळी नाही. अद्वैत तत्त्वज्ञानास या संप्रदायाची मान्यता आहे. समर्थाचे व त्यांच्या संप्रदायाचे आराध्यदैवत श्री रामचंद्र आहे. समर्थांची रामभक्ती व तदविषयक त्यांचे साहित्य हे भावार्थ रामायणाची उत्तरावस्था दर्शविणारे आहे. दक्षिण भारतात मराठी साहित्याच्या निर्मितीच्या दीर्घकालीन परंपरा प्रस्थापित करण्याचे श्रेय समर्थाकडे जाते.

समर्थांची रचना विपुल आहे. सुंदरकांड आणि युद्धकांड अशी रामायणातील त्यांची कथापर रचना आहे. पूर्वारंभ, आत्माराम, चतुर्थराम, जुनाटपुरुष अशी काही अध्यात्मिक प्रकरणे त्यांनी लिहिली आहेत. उतारवयात लिहिलेल्या परचक्रनिरूपण, अस्मानी सुलतानी, आनंदभवन, क्षात्रधर्म, भवानीची प्रार्थना, संभाजीस पत्र अशी राजकीय प्रकरणे विषदशकीय आणि २०० समासाचा दासबोस लिहिला आहे. करुणाष्टके म्हणजे त्यांच्या अर्थमनाचा सहज सुंदर आविष्कार आहे. रामदासाची भाषा स्पष्ट आणि रोखठोक आहे. तेथे शब्दाची कोवळीक नाही, तर धनुष्याचा टणत्कार आहे. सामर्थ्याच्या आत्मविश्वासांचा हुंकार त्यात जाणवतो. रामदासाचे शब्दभांडार अपार आहेत. या शब्दावर ते कोणाताही संस्कार करत नाहीत. त्यांची कशीही रूपे ते बेधडक वापरतात. पण असा त्यांचा उद्गार अंतःकरणाला जाऊन भिडतो. कारण त्यातील प्रांजळपणा केवळ निकोप आहे.

**समारोप**

एकंदरीत मध्ययुगीन भक्ती संप्रदायाने लोकभाषेचा पुरस्कार करून मराठी साहित्यात अनेक वाङमय प्रकार निर्माण केले. मराठी साहित्य समृद्ध करण्यात या भक्तीसंप्रदायांचा मोलाचा वाटा आहे असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही.

**निष्कर्ष**

१. मध्ययुगीन भक्ती संप्रदायाची साहित्य निर्मितीची प्रेरणा ही धार्मिक स्वरूपाची आहे.

२ . भक्ती संप्रदायाने आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रचार व प्रसारासाठी लोकभाषेचा वापर केला.

३. मध्ययुगीन भक्ती संप्रदायाने अभंग, चरित्र, आत्मचरित्र असे विविध वाङमय प्रकार निर्माण केले आहेत.

४. मराठी साहित्यात लोक जीवनातील अनेक शब्द, म्हणी, वाक्प्रचार यांचा वापर करण्यात आला आहे.

५. मध्ययुगीन मराठी साहित्य समृद्ध करण्यात भक्ती संप्रदायाने हातभार लावला आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. कुलकर्णी श्रीधर,'मध्ययुगीन मराठी साहित्य: एक पुनर्विचार' राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९५ पृ.८२

२. तत्रैव पृ.८४

३. तत्रैव पृ.८६

४. तत्रैव पृष्ठ ८६

५. तत्रैव पृष्ठ ८७.

**मध्ययुगीन भक्ती संप्रदाय आणि मराठी साहित्य**
**प्रा. डॉ. विनायक जाधव**